## नियमित दिवाणी दावा क्र. १६४/२०२५

## सी.एन.आर.क्र.एम.एच.एस.आय. ०९–०००५६३–२०२५

## निशाणी क्र.१८ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज हा अर्जदार नामे राजेश वाळके यांनी प्रस्तुत प्रकरणी हजर केलेले दि.१६/०९/२०२५ रोजीच्या खरेदीखताची मूळ प्रत परत मिळावी याकरिता दाखल केला आहे.

०२. अर्जदार यांनी आपल्या अर्जामध्ये असे कथन केले आहे की, त्यांनी प्रस्तुत प्रकरणी त्यांना पक्षकार करुन घेण्याकरिता दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० अंतर्गत अर्ज दाखल केला असून त्या पुष्टयर्थ दि.१६/०९/२०२५ रोजीचे अस्सल खरेदीखत हजर केले आहे. परंतु सदर खरेदीखत हे बँकेमध्ये जमा करण्याकरिता त्यांना आवश्यक आहे. त्यांनी जेव्हा आवश्यकता भासेल तेव्हा प्रस्तुत खरेदीखत न्यायालयात हजर करण्याची हमी दिली आहे. त्यामुळे अर्जदार यांनी दि.१६/०९/२०२५ रोजीचे अस्सल खरेदीखतची प्रत परत मिळावी अशी विनंती केली आहे.

०३. अर्जाचे अवलोकन केले. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रस्तुत अर्जदार यांनी त्यांना पक्षकार करुन घेण्याकरिता दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० अंतर्गत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार यांच्या अर्जातील मागणीचा विचार केला असता अस्सल खरेदीखत त्यांना अटीस अधीन राहून परत देणे न्यायोचित वाटते. वरील सर्व परिस्थीतीचा विचार करता मी खालील प्रमाणे आदेश करत आहे.

## – आदेश –

१. अर्ज नि.क्र.१८ मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार यांना दि.१६/०९/२०२५ रोजीचे प्रस्तुत प्रकरणी हजर केलेले अस्सल खरेदीखत सही शिक्क्याची नक्कल अभिलेखावर ठेवून परत देण्यात यावे.

३. न्यायालय ज्या वेळेस आदेश करेल त्या वेळेस अर्जदार यांना प्रस्तुत अस्सल खरेदीखत अभिलेखावर करणे अनिवार्य असेल.

SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Digitally signed by SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Date: 2026.03.31 12:49:54 +0530

( श्रीकांत एस. पचंडी )
दिनांकः ३१/०३/२०२६ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर देवगड